04-04-2025-Dai-03a_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/03/2025 9:34 PM Page 1



निवडक



हरमल : जेरबंद करण्यात आलेला बिबट्या.

## हरमलात बिबट्या जेरबंद

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ३ :** नानोस्करवाडा भागांत बिबट्याच्या दहशतीला पूर्णविराम मिळाला असून,वन खात्याने अडकवलेल्या पिंजऱ्यात जेरबंद झाल्याने नागरिकांनी सुटकेचा सुस्कारा सोडला आहे. तब्बल १४ दिवसानंतर लावलेल्या सापळ्यात बिबट्या अडकला.दरम्यान, गेल्या महिन्यांत तीन बच्छडेसहित बिबट्या रस्ता ओलांडताना वरचावाडा रस्त्यावर निर्जन भागात दिसला होता. त्यातील हा एक बछडा असावा,अशी शक्यता असल्याचे सांगितले. गुरुवारी पहाटे ३ च्या सुमारास सागर नानोस्कर यांच्या घराच्या बाजूला लावलेल्या सापळ्यात बिबट्या सापडला. त्या पिंजऱ्याला जोडून दुसऱ्या लहान पिंजऱ्यात पाळीव कुत्रा बंद केला होता. सदर बिबट्या ११-१२ महिन्यांचा असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, वन खात्याचे अधिकारी स्नेहल साळगावकर यांनी सदर बिबट्याचे आवश्यक सोपस्कार पूर्ण करून तसेच वैद्यकीय तपासणी केल्यानंतर नंतर त्याला अधिवासात सोडले जाईल, असे सांगितले. यावेळी वनरक्षक अविनाश परब, जितेंद्र नाईक तसेच सागर नानोस्कर आदींनी यांनी सहकार्य केले. गेल्या आठवड्यात मधलावाडा येथील मर्सेलिन फर्नांडिस यांचा पाळीव कुत्रा फस्त केला होता. कदाचित हाच बिबट्या असण्याची शक्यता काहींनी व्यक्त केली.

# केबल कापण्याचा निर्णयाला स्थगिती

## विद्युत विभागाने चूक केली मान्य : काशिनाथ शेट्ये म्हणतात , आदेशांचे पालन करणार

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. ३ :** इंटरनेट आणि टेलिव्हिजन केबल सेवा देणाऱ्या केबल्स कापण्याचा निर्णय सरकारच्या निर्देशानुसार पुढील आदेशापर्यंत स्थगित ठेवण्यात आला आहे, अशी माहिती मुख्य विद्युत अभियंता (सीईई) स्टीफन फर्नांडिस यांनी गुरुवारी दिली.

पत्रकारांशी संवाद साधताना फर्नांडिस म्हणाले की, हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. अनेक इंटरनेट सेवा प्रदाते आणि केबल ऑपरेटरच्या मोठ्या प्रमाणावर केबल्स विद्यमान आहेत. पूर्वी काही त्रुटींमुळे या केबल्सना खांबांवर जागा देण्यात आली. मात्र, सद्यस्थितीत त्या अचानक काढणे शक्य नाही. केबल्स हटवताना सुरक्षा, कायदेशीर आणि आर्थिक समस्यांचा विचार करावा लागतो. यापूर्वी आम्ही केबल्स काढण्याची प्रक्रिया सुरू केली होती, पण त्यावेळी विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू होत्या. सध्या अनेक व्यवसाय इंटरनेट सेवांवर अवलंबून असल्याने या सेवांमध्ये व्यत्यय आल्यास अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे, केबल्स हटवण्याचा निर्णय घेताना अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे,असे त्यांनी स्पष्ट केले.

फर्नांडिस यांनी कबूल केले की, ही आमचीच चूक आहे. जर केबल्स हटवायच्या होत्या, तर त्या सुरुवातीलाच हटवायला हव्या होत्या.

सर्वप्रथम, सेवा प्रदात्यांकडून किती शुल्क आकारले जावे, याचा विचार करणे गरजेचे आहे. आमच्या नोडल अधिकाऱ्यांनी यासंदर्भात काही गणना केली आहे. मात्र, काही केबल ऑपरेटरनी त्या गणनांमध्ये त्रुटी असल्याचे निदर्शनास आणले आहे. त्यामुळे हा वाद सोडवण्याची आवश्यकता आहे, असे फर्नांडिस यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, सेवा प्रदाते केव्हा आले याची निश्चित माहिती आमच्याकडे नाही. विचारले असता ते नेहमीच सांगतात की ते अलीकडेच आले आहेत. मात्र, वीज विभाग त्यांना गेल्या दहा किंवा वीस वर्षांपासून येथे कार्यरत असल्याचे सांगू शकत नाही. त्याचप्रमाणे, सेवा प्रदात्यांकडून शुल्क वसूल करण्यासाठी आवश्यक असलेला ठोस डेटा आमच्याकडे नाही.

दरम्यान, 'मी किंवा केबल्स' अशी ठाम भूमिका मांडुन केबल कापण्याची धडकेबाज मोहीम राबवणारे वीज विभागाचे कार्यकारी अभियंता काशिनाथ शेट्ये यांनी स्पष्ट केले की, मी एक सरकारी कर्मचारी आहे. मला आदेशांचे पालन करावे लागेल. मी आदेशाविरोधात काहीही बोलू शकत नाही. यापूर्वी वीज विभागाने काशिनाथ शेट्ये यांचा कार्यभार कमी करत त्याठिकाणी दोन नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली होती.

## फूटपाथ अतिक्रमणप्रकरणी पंचायत सचिवाविरोधात तक्रार

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३ :** जुने गोव्यातील वेलंकणी अपार्टमेंट्स आणि कार्ल सेंटर येथील रहिवाशांनी गोवा मानवाधिकार आयोगाकडे तक्रार दाखल केली असून, फूटपाथवरील अतिक्रमणे हटविण्याच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. तसेच आदेशाचा अवमान झाल्याचा आरोप करत पंचायत सचिव आणि एका पंचसदस्याविरोधात कारवाईची मागणी केली आहे.

आयोगाने यावर्षी फेब्रुवारी महिन्यात ओल्ड गोवा पंचायतीला निर्देश दिले होते की, वेलंकणी अपार्टमेंट्स आणि कार्ल सेंटरसमोरील पादचाऱ्यांसाठी असलेले फूटपाथ अडथळ्यांमुक्त करण्यात यावेत. तसेच, स्थानिक पोलिसांना पंचायतीला आवश्यक संरक्षण देण्याचे आदेश देण्यात आले होते. आयोगाने २१ मार्चपर्यंत फूटपाथ हटविण्याचा अहवाल सादर करण्याचे निर्देशही दिले होते.

२१ मार्च रोजी पंचायत सचिवांनी आयोगासमोर अहवाल सादर करत फूटपाथ रिकामा करण्यात आल्याचे स्पष्ट केले आणि प्रकरण मिटल्याचे जाहीर करण्यात आले. मात्र, रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, प्रत्यक्षात कोणतीही कारवाई

**▶ आदेशाचा अवमान झाल्याचा आरोप : अहवाल सादर करण्याचे दिले होते निर्देश**

करण्यात आलेली नव्हती. उलट, १८ मार्चच्या मध्यरात्री स्टॉलधारकांनी स्वतःहून आपले स्टॉल्स हलवून ते सर्व्हे क्रमांक ११७ मधील सरकारी मालमत्तेत स्थायिक केले.

रहिवाशांच्या आरोपानुसार, पंचायत सचिवांनी याप्रकरणी कोणतीही ठोस कारवाई केली नाही. तसेच, त्यांनी रहिवाशांना फूटपाथची पडताळणी करण्यासाठी पत्र पाठवले आणि नंतर न्यायालयात खेचण्याची धमकी दिली. विशेष म्हणजे, २१ मार्चला लेखी स्वरूपात फूटपाथ रिकामा असल्याचा अहवाल दिल्यानंतर अवघ्या दोनच दिवसांत हेच बेकायदेशीर स्टॉल पुन्हा उभे राहिले, असा दावा रहिवाशांनी केला आहे.

यासोबतच, एका पंचसदस्याने या अतिक्रमणांना पाठिंबा दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे, ग्रामपंचायत सचिव आणि संबंधित पंचसदस्य यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी रहिवाशांनी गोवा मानवाधिकार आयोगाकडे केली आहे.

## फोंडा मासळी बाजारासाठी नव्या इमारतीचा निर्णय

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ३ :** फोंडा महानगरपालिकेने (पीएमसी) जुन्या आणि जीर्ण अवस्थेतील मासळी बाजार इमारत पाडून नव्या बाजाराच्या उभारणीचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर, सध्याच्या मासळी विक्रेत्यांना तात्पुरते स्थलांतरित करण्यासाठी मार्केट कॉम्प्लेक्सच्या बेसमेंट पार्किंग क्षेत्राची निवड करण्यात आली आहे. मात्र, स्थलांतराच्या प्रक्रियेबाबत विक्रेत्यांमध्ये चिंता व्यक्त करण्यात येत असून, त्यांनी पालिकेकडे विश्वासात घेण्याची मागणी केली आहे.

मासळी विक्रेत्यांनी पीएमसीकडे तात्पुरत्या जागेत आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. यात वीज व पाणीपुरवठ्याच्या सोयींसह व्यवस्थित व्यवसाय करण्यासाठी पुरेशी जागा मिळावी, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.

मासळी विक्रेते संघटनेने विद्यमान बाजारपेठ धोकादायक अवस्थेत असल्याची कबुली दिली असली, तरी तिथे कार्यरत विक्रेत्यांना योग्य सुविधा देण्याच्या मुद्द्यावर त्यांनी पीएमसीकडे पाठपुरावा केला. विक्रेत्यांच्या एका शिष्टमंडळाने पीएमसी अध्यक्ष आनंद नाईक यांची भेट घेऊन आपल्या अडचणी मांडल्या.

विक्रेत्यांनी स्पष्ट केले की, ते स्थलांतरास तयार आहेत, मात्र नवीन जागेत त्यांच्यासाठी पुरेशी आणि अनुकूल व्यवस्था असावी. याशिवाय, व्यवसाय सुरळीत सुरू ठेवण्यासाठी काही अतिरिक्त जागा उपलब्ध करून द्यावी, अशीही त्यांची मागणी आहे. सध्या फोंडा मासळी बाजारात सुमारे ११३ विक्रेते कार्यरत आहेत.

पीएमसी अध्यक्ष आनंद नाईक यांनी सांगितले की, फोंडा मासळी बाजाराची इमारत १९८२ मध्ये बांधली गेली होती आणि ती आता पूर्णपणे जीर्ण झाली आहे. सुरक्षा आणि सुविधा लक्षात घेता नवीन इमारत बांधण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठी ४ एप्रिल रोजी महापालिकेच्या सभागृहात बैठक आयोजित करण्यात येणार आहे.

पालिकेच्या अधिकाऱ्यांसह मासळी विक्रेत्यांची बैठक घेऊन त्यांच्या मागण्यांचा विचार केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. सध्या बाजाराची स्थिती धोकादायक असल्याने स्थलांतर अपरिहार्य आहे. तसेच, पहिल्या मजल्यावर कार्यरत विक्रेत्यांनाही सुरक्षिततेच्या कारणास्तव स्थलांतरित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पालिकेच्या या निर्णयामुळे मासळी विक्रेत्यांची चिंता काही प्रमाणात वाढली असली, तरी योग्य उपाययोजना करून व्यवसाय सुरळीत राहील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



### गटारावर झाकण कधी ?

**मळा : येथील जुन्या एनजीपीडीए कार्यालयातील उघड्या गटाराचे रूपांतर डासांच्या वाढत्या उत्पत्तीच्या ठिकाणात झाले आहे, ज्यामुळे ये-जा करणाऱ्यांसाठी मोठा धोका निर्माण झाला आहे. हा धोका कमी करण्यासाठी, अधिकाऱ्यांनी इथली स्वच्छता करून आणि त्याला त्वरित झाकण बसवावे, अशी मागणी होत आहे .** (उपेंद्र नाईक )

# आयओएस सागरवर आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण

## दक्षिण नौदल कमांड येथे बंदर आणि सागरी प्रशिक्षण टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण

**कोची, दि. ३ :** भारतीय नौदलाच्या ऐतिहासिक उपक्रमाचा भाग असलेल्या हिंद महासागर जहाज म्हणून ओळख असलेल्या सागर जहाजाने कोची येथील दक्षिण नौदल कमांड येथे बंदर आणि सागरी प्रशिक्षण टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण केला असून, आता हे जहाज आपल्या आंतरराष्ट्रीय क्रूसह कारवारकडे रवाना झाले आहे.

९ मैत्रीपूर्ण परदेशी राष्ट्रांतील ४४ आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणार्थींनी या विशेष प्रशिक्षण कॅम्पमध्ये सहभाग घेतला. यात मूलभूत सीमनशिप क्रियाकलापांपासून ते अत्याधुनिक



सिम्युलेटर प्रशिक्षणापर्यंतचे विविध टप्पे समाविष्ट होते. एक महासागर, एक अभियान' या ब्रीदवाक्याला साजेशा पद्धतीने, सहभागी क्रूला संप्रेषण कौशल्ये, अग्निशमन आणि नुकसान नियंत्रण कवायती, व्हिजिट बोर्ड सर्च अँड सीझ प्रक्रिया आणि ब्रिजमनशिप यासारख्या महत्त्वाच्या बाबींवर व्यापक प्रशिक्षण देण्यात आले.

सागरी सुरक्षा आणि प्रतिसाद क्षमता वाढवण्यासाठी, प्रशिक्षणार्थींना सिम्युलेटर-आधारित व्यावहारिक प्रशिक्षण दिले गेले. या प्रशिक्षणादरम्यान विविध सागरी परिस्थितींचा आभासी अनुभव घेण्याची संधी मिळाली. यासोबतच, सहभागी नौदलांमध्ये सर्वोत्तम प्रशिक्षण पद्धती आणि प्रक्रियांची देवाणघेवाण होण्यासही मदत झाली.

गेल्या काही दशकांमध्ये, भारतीय नौदलाच्या सागरी प्रशिक्षण संस्थांनी ५० हून अधिक विदेशी मित्र देशांतील २० हजाराहून अधिक अधिकारी आणि खलाशांना प्रशिक्षण दिले आहे. यात प्रारंभिक प्रशिक्षणापासून ते उच्चस्तरीय सागरी कौशल्ये आणि क्षमतावृद्धी करणाऱ्या विशेष अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

भारतीय नौदलाच्या वर्क-अप टीमने सुनयना या नौदल जहाजावर आंतरराष्ट्रीय क्रूला समुद्री प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष परिचय करून दिला. या प्रशिक्षणाचा उद्देश आंतरराष्ट्रीय क्रूला भारतीय नौदलाच्या प्रणाली आणि कार्यप्रणालींशी जुळवून घेण्यास मदत करणे हा होता, जेणेकरून आगामी तैनातीदरम्यान ते एकसंध आणि समन्वयित पद्धतीने कार्य करू शकतील.

आयओएस सागर हे सागरी समन्वय आणि प्रादेशिक स्थैर्य वृद्धिंगत करण्याच्या भारतीय नौदलाच्या प्रयत्नांचे एक उत्तम उदाहरण आहे. हिंद महासागर प्रदेशातील भागीदार राष्ट्रांसोबत सहकार्य वाढवणे, सागरी सुरक्षेसाठी क्षमता विकसित करणे आणि सामूहिक हितसंबंधांचे रक्षण करणे यासाठी भारतीय नौदल कटिबद्ध असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे. भारतीय नौदलाच्या या उपक्रमामुळे केवळ आंतरराष्ट्रीय स्तरावर मैत्रीपूर्ण संबंध बळकट होणार नाहीत, तर जागतिक सागरी सुरक्षेला देखील चालना मिळणार आहे.

## आर्थिक भार कमी करण्याची रेशन दुकानदारांची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३ :** ऑल गोवा फेअर प्राईस शॉप ओनर्स असोसिएशनने मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना पत्र पाठवून रास्त भाव दुकानांच्या कार्यक्षमतेचा आढावा घेण्यासाठी स्थापन केलेल्या समितीच्या शिफारशी त्वरित लागू करण्याची मागणी केली आहे.

समितीने गेल्या वर्षी एफपीएस डीलर्सच्या व्यवहार्यता वाढीसाठी मसुदा योजना तयार केली होती. या योजनेत पीओएस (पॉइंट ऑफ सेल) मशीनच्या भाड्याचे दर प्रतिकिलो ०.१० रुपये रद्द करण्याचा प्रस्ताव होता. तसेच, ईपीओएस उपकरणांच्या वापरासाठी प्रोत्साहन म्हणून १०५ रुपये प्रति टन अनुदान देण्याची शिफारस करण्यात आली होती. एफपीएस डीलर्सच्या कामकाजासाठी लागणाऱ्या खर्चाच्या अनुषंगाने ९,५०० रुपयांची निश्चित रक्कम देण्याचाही प्रस्ताव होता. यामध्ये कामगारांचे वेतन, वीज बिल, भाडे तसेच पालिका व पंचायत करांचा समावेश आहे.

योजनेत एपीएल तांदळावरील मार्जिन प्रति किलो ०.३५ रुपयांनी वाढवण्याची तरतूद असून, एपीएल तांदळाची विक्री किंमत १२.५० रुपयांवरून १६.५० रुपये करण्याचा प्रस्ताव आहे.

ऑल गोवा कंझ्युमर को-ऑपरेटिव्ह सोसायटी आणि फेअर प्राईस शॉप ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष जोकिम फर्नांडिस यांनी मुख्यमंत्री सावंत यांना पाठवलेल्या पत्रात मागणी केली आहे की, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या वाहतूक आणि कामगार शुल्काच्या स्वरूपातील १ कोटी रुपयांहून अधिक थकबाकी त्वरित वितरित करण्यात यावी. असोसिएशनने सरकारच्या दुर्लक्षाचा मुद्दा उपस्थित करत पणजी व मडगाव येथील सार्वजनिक बैठकीत घेतलेले मूलभूत निर्णय अद्याप अंमलात आणले नसल्याकडे लक्ष वेधले आहे. पीओएस मशीन सुरू करताना आम्हाला २५,००० रुपये देण्यास सांगण्यात आले होते. मात्र, ती खरेदी करणे शक्य नसल्याने सरकारने प्रति बिल १० पैसे भाडे आकारण्यास सुरुवात केली आणि आवश्यक पेपर रोल पुरवले. काही काळानंतर पेपर रोल पुरवठा थांबवण्यात आला, मात्र भाडे आकारणी सुरूच राहिली, ज्यामुळे लाखो रुपयांचा आर्थिक भार डीलर्सवर पडला आहे. त्यामुळे ही शुल्क प्रणाली त्वरित बंद करावी, अशी मागणी असोसिएशनने केलीआहे.

## कोमुनिदाद संस्थांचे संगणकीकरण होणार

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३ :** गोवा सरकारने राज्यातील पारंपरिक आणि ऐतिहासिक कोमुनिदाद संस्थांच्या व्यवस्थापनात आमूलाग्र सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत संस्थांच्या नोंदी संगणकीकृत (डिजिटायझेशन) करण्याबरोबरच स्वतंत्र प्रशासकांची नियुक्ती करून व्यवस्थापन अधिक सुव्यवस्थित करण्याच्या दिशेने सरकारने मोठे पाऊल उचलले आहे.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी कोमुनिदाद संस्थांच्या प्रतिनिधींशी बैठक घेतल्यानंतर हा निर्णय जाहीर केला. या बैठकीत संस्थांना अधिक आर्थिक अधिकार बहाल करण्यासह विविध सुधारणा उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री सावंत यांनी सांगितले की, सर्व कोमुनिदाद संस्थांमध्ये संगणक ऑपरेटर आणि लिपिकांची नियुक्ती करण्याचा तसेच त्यांच्या नोंदींचे पूर्ण डिजिटायझेशन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**▶ व्यवस्थापन अधिक सुव्यवस्थित करण्याच्या दिशेने सरकारचे मोठे पाऊल**



सुरुवातीला मोठ्या कोमुनिदाद संस्थांपासून ही प्रक्रिया सुरू केली जाईल. सावंत यांनी असेही स्पष्ट केले की, सरकार सर्व कोमुनिदाद संस्थांच्या नोंदींचे १०० टक्के डिजिटायझेशन पूर्ण करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. सरकारने प्रत्येक कोमुनिदादसाठी स्वतंत्र प्रशासक नियुक्त करण्याचा निर्णय घेतला असून या प्रक्रियेला गती देण्याच्या दृष्टीने भरती प्रक्रियाही वेगवान केली जाणार आहे. सावंत म्हणाले की, बैठकीदरम्यान, संस्थांचे कामकाज अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम करण्यासाठी स्वतंत्र प्रशासकांची आवश्यकता असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. सरकारने या मागणीची दखल घेतली आहे आणि लवकरच प्रशासकांची नियुक्ती केली जाईल.

गोव्यातील कोमुनिदाद संस्था पोर्तुगीज राजवटीदरम्यान, एप्रिल १९६१ मध्ये जारी करण्यात आलेल्या संहितेच्या आधारे कार्यरत आहेत. या व्यवस्थापन पद्धतीत सुधारणा करण्यासाठी राज्य सरकारने २०२३ मध्ये गोवा विधान पदविका क्रमांक २०७० मध्ये सुधारणा केली होती. या सुधारणांमुळे सरकारला कोमुनिदाद व्यवस्थापन समित्या निलंबित करण्याचा अधिकार प्राप्त झाला असून, जनतेच्या हिताच्या विरोधात काम करणाऱ्या समित्यांवर सरकारी प्रशासकांची नियुक्ती करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच व्यवस्थापन समित्यांच्या निवडणुकांचे नियंत्रण सरकारकडे असणार आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे कोमुनिदाद संस्थांचे प्रशासन अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मडगाव पालिकेच्या तिजोरीत पहिल्याच दिवशी १४ लाख रुपयांची भर

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३ :** नवीन आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी, मडगाव नगरपरिषदेच्या तिजोरीत कर संकलनाच्या माध्यमातून १४ लाख रुपयांची भर पडली. व्यापार परवाने आणि इतर नागरी सेवांसाठी शुल्कवाढ लागू झाल्याने हे संकलन वाढल्याचे स्पष्ट झाले आहे.

नगरपरिषदेच्या माहितीनुसार, बुधवारी गृहकर भरणाऱ्या नागरिकांकडून ८.०२ लाख रुपये प्राप्त झाले, तर व्यापार परवाने, साइनबोर्ड तसेच इतर सेवांसाठी घेतलेल्या शुल्कांमधून जवळपास ६ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. तळमजल्यावरील कर संकलन काउंटरवर करदात्यांची मोठी गर्दी दिसून आली. व्यापार परवाना शुल्कात झालेल्या बदलांविषयी माहिती घेण्यासाठी अनेक करदाते थेट कर विभागाकडे जाताना दिसले. नवीन शुल्क व कर दर शिस्तबद्धपणे लागू करण्यात आले असल्याची खात्री नगर परिषदेने करून दिली आहे. व्यापार परवाना शुल्क भरताना नागरिकांना नवीन दराविषयी स्पष्टता मिळावी, यासाठी कर विभागाने मार्गदर्शन केले. कर विभागाकडून




**▶ व्यापार परवाने शुल्कवाढ लागू झाल्याने संकलन वाढल्याचे स्पष्ट**

आवश्यक सुधारणा करण्यात आल्यानंतरच संकलन काउंटरने देयक स्वीकारण्यास सुरुवात केली.

मडगावचे नगराध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी व्यापार परवाना आणि इतर नागरी शुल्कांत वाढ करण्याच्या निर्णयाचे समर्थन केले आहे. त्यांनी सांगितले की, ही शुल्कवाढ बराच काळ प्रलंबित होती. मात्र, परिषदेने गृहकर दरांत कोणताही बदल केलेला नाही.

व्यापार परवान्याच्या संदर्भात, व्यावसायिक आस्थापनांच्या आकारानुसार शुल्कात सुधारणा करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सततच्या विलंबामुळे मागील काही वर्षांमध्ये शुल्क वाढ लागू करता आली नाही. विरोधक परिषदेला दोष देत असले तरी इतर अ-वर्ग नगरपालिका संस्थांच्या तुलनेत ही शुल्कवाढ अजूनही तुलनेने कमी आहे,असे नगराध्यक्षांनी सांगितले.

नगर परिषदेकडून कर संकलन अधिक सुव्यवस्थित करण्यासाठी तळमजल्यावरील कलेक्शन काउंटरवर मदत कक्ष स्थापन करण्यात येणार आहे.

व्यापार परवाना भरण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना कर विभागात त्यांचे परवाना शुल्क अपडेट करून मगच कलेक्शन काऊंटरवर येण्यास सांगितले जाईल. यामुळे नागरिकांना एका ठिकाणी विनाकारण गर्दी करावी लागणार नाही व प्रक्रिया अधिक गतीने पार पडेल, असे नगराध्यक्षांनी स्पष्ट केले.